**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
**७वा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका इमारत,**
**सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई — ४००६१४**

आदेश क्र.नपप्रसं २०२६/मनपा विशिष्ट नागरी सेवा व सुविधा निधी/कक्ष-७/2207113 दिनांक- 13 APR 2026

**वाचा-** १. नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२३४/नवि-१६, दि. ३१ मार्च, २०२३.

२. शासन निर्णय क्रमांक नपरि-२०२६/प्र.क्र.२५ /नवि-१६(ई-१५५५९८१) दि.२७ मार्च,२०२६.

**सन २०२२-२०२३ साठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (महानगरपालिका) परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरवण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.लेखाशीर्ष (३६०४१००९) अंतर्गत रक्कम रु.२९.९७ कोटी निधी वितरण आदेश क्र.८**

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२३४/नवि-१६, दिनांक ३१ मार्च, २०२३ अन्वये सन २०२२-२०२३ वित्तीय वर्षासाठी 'नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (महानगरपालिका ) परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे' लेखाशीर्ष (३६०४१००९) या योजनेखाली राज्यातील महानगरपालिकांना शासनाने वेळोवेळी आदेशीत केल्यानुसार निधी वितरीत करण्याकरिता नगरपरिषद प्रशासन संचालनालयास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

उपरोक्त वाचामधील क्र. २ च्या शासन निर्णयान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (महानगरपालिका) परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे या योजनेखाली लेखार्शीर्ष (३६०४१००९) अंतर्गत महानगरपालिकेला एकत्रित **रक्कम रु.२९,९७,००,०००/- (रुपये एकोणतीस कोटी सत्याण्णव लाख फक्त)** इतका निधी वितरीत करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयांची निधी खर्च करण्यासाठी वित्त विभाग, शासन निर्णय क्रः संकिर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दि. ०६.०६.२००८ मधील तरतुदींनुसार खर्च करणे बंधनकारक राहील असे उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

सोबत नमूद करण्यात आलेल्या परिशिष्ट -अ मध्ये नमूद करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी /जिल्हा प्रशासन अधिकारी (संबधित), जिल्हाधिकारी कार्यालय यांना नगरविकास विभाग नवि-१६ कडील शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्याचे आदेशीत केलेनुसार संबधितांनी कळविलेल्या त्यांच्या बँक खातेवर निधी वितरीत करण्यात येत आहे.

| आदेश क्र. ८ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| परिशिष्ट- अ | | | | | | |
| **महानगरपालिका क्षेत्रात विशिष्ठ नागरी सेवा व सुविधा लेखाशीर्ष (३६०४१००९) योजनेअंतर्गत निधी वितरीत करणेबाबत.** | | | | | | |
| अ.क्र. | जिल्हा | महानगरपालिका/ नगरपरिषद /नगरपंचायत चे नाव | निधी वर्ग करण्यात आलेले कार्यालय | आदेश क्रमांक व दिनांक | रक्कम अंकात(रु.) | रक्कम अक्षरात(रु.) |
| १ | ठाणे | ठाणे महानगरपालिका | जिल्हाधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे | शासन निर्णय क्रमांक नपरि-२०२६/प्र.क्र.२५ /नवि-१६(ई-१५५५९८१) दि.२७ मार्च,२०२६ | 29,97,00,000.00 | रक्कम रु.एकोणतीस कोटी सत्याण्णव लाख फक्त |
| **एकुण रक्कम रु.** | | | | | 29,97,00,000.00 | **रक्कम रु.एकोणतीस कोटी सत्याण्णव लाख फक्त** |

संदर्भ क्र.२ अन्वये **शा**सनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील विहित केलेल्या कार्यपद्धती, सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यांचे काटेकोरपणे पालन करून जिल्हा प्रशासन अधिकारी/ जिल्हा सह आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा. तसेच वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात यावे व सदर उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत संचालानालायास सादर करण्यात यावी.

सदर निधी खात्यात जमा झाल्यानंतर, ७ दिवसात निधी प्राप्त झाल्याची पोहोच संचालनालयास सादर करावी. आपली पोहोच प्राप्त न झाल्यास संचालनालय आदेशान्वये आपले कार्यालयास निधी प्राप्त झाला आहे असे ग्राह्य धरण्यात येईल.

मा. आयुक्त तथा संचालक, न.प.प्र.सं. यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे)
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई

प्रत-

१. अवर सचिव, नगरविकास विभाग -१६, मंत्रालय, मुंबई -३२.
२. संबधित जिल्हाधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय.
३. संबधित आयुक्त, महानगरपालिका.